अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## एसटी चालवताना मोबाईलवर बोलण्यास प्रतिबंध

**थेट कार्यवाही करण्याचे एसटी महामंडळाने दिले निर्देश**

**मुंबई** : एसटी बस चालवत असतांना भ्रमणध्वनीवर बोलणे अथवा हेडफोन घालून भ्रमणध्वनीवरील गाणी, व्हिडीओ ऐकणे, बघणे अशी चालकाची एकाग्रता भंग करणारी कृत्ये चालकाकडून घडल्यास त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार कडक कार्यवाही करण्याचे निर्देश एसटी प्रशासनाने दिले आहेत.

एसटीचा प्रवास हा सुरक्षित प्रवास म्हणून ओळखला जातो. गेली ७५ वर्षे प्रवाशांची विश्वासर्हता जपण्यामध्ये एसटीच्या निर्व्यसनी व सुरक्षित वाहन चालवणाऱ्या चालकांचा खुप मोठा वाटा आहे. परंतु, गेल्या काही दिवसांमध्ये एसटी बस चालवित असतांना भ्रमणध्वनीवर बोलणे, कानात हेडफोन घालून गाणी ऐकणे, भ्रमणध्वनीवरील व्हिडिओ पाहणे अशा चालक व प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असलेल्या कृत्यामुळे बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मनात असुरक्षिततेची भावना बळावते.



याबद्दल समाज माध्यमातून, लोकप्रतिनिधींमार्फत अनेक तक्रारी एसटी महामंडळाकडे दाखल झाल्या आहेत. यापुढे अशा घटना निर्दशनास आल्यास संबंधीत चालकावर निलंबनापर्यंतची प्रमादीय कार्यवाही करण्याचे निर्देश एसटी वरिष्ठ प्रशासनाने दिले आहेत, असे जनसंपर्क अधिकारी अभिजीत भोसले यांनी कळविले आहे.

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.२१ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ५२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

### सूरत-चेन्नई महामार्ग; अंतिम नोटीसीची मुदत संपली

# संपादित जमिनीचा दोन दिवसांत पोलीस बंदोबस्तात सक्तीने ताबा

### भूसंपादन अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केला प्रस्ताव

सुराज्य/सोलापूर

**केंद्र शासनाच्या भारतमाला परियोजनेअंतर्गत सुरत-चेन्नई हा राष्ट्रीय हरित महामार्ग संपादित जमिनीचा ताबा देण्यास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलेली अंतिम नोटीसचा मुदत संपली आहे. त्यामुळे आता सक्तीने जमीन ताब्यात घेण्याचा प्रस्ताव भूसंपादन अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे. इकडे जीव गेला तरी हरकत नाही, मात्र जमिनीचा ताबा देणार नाही, अशी आक्रमक भूमिका अक्कलकोटसह इतर शेतकऱ्यांनी घेतला. त्यामुळे प्रशासन- शेतकरी असा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.**



सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट या तीन तालुक्यातून हा महामार्ग जात आहे. सध्या या महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे.

मात्र दर कमी मिळत असल्याने शेतकरी जमिनी द्यायला विरोध करीत आहेत. जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा ताबा देण्याचे आवाहन केले असून, जे शेतकरी ताबा देणार नाहीत, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ ए मधील तरतुदीनुसार सक्तीने घेतल्या जातील अशी तंबी देणाऱ्या नोटिसा बजावल्या होत्या. अंतिम नोटिसीची ६० दिवसांची मुदत संपली आहे. त्यामुळे संपादीत झालेल्या बाधित शेतकऱ्यांच्या जमीन सक्तीने ताब्यात घेण्याचा प्रस्तवाचा भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केला. दोन दिवसात पोलीस बंदोबस्तात बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताब्यात घेण्याची प्रक्रिया चालू करणार आहेत.

प्रशासनाकडून चार वेळा बैठक घेतल्या. मात्र शेतकरी आडमुठी भूमिका घेत असल्याने हे सक्तीचे पाऊल उचलावे लागत असल्याचे पाटील यांनी सांगितले. इकडे संघर्ष समितीच्या माध्यमातून ताबा न देण्याची अशी भूमिका घेतल्याने या महामार्गाचा मावेजा प्रकरण चिघळण्याची शक्यता आहे. सुरत- चेन्नई या महामार्गासाठी बार्शी तालुक्यात ६१४ गटातून १५९ जणांचे मागणी प्रस्ताव आले. त्यापैकी ७८ जणांचे पैसे त्यांच्या खात्यावर वर्ग केले.

उर्वरित लोकांचे पैसे त्यांच्या अंतर्गत वादामुळे थकीत आहेत. अक्कलकोट तालुक्यात ४२५ गटांमधील ५३ जणांचे प्रस्ताव प्राप्त झाले. यातील फक्त १४ जणांनी पैसे घेतले. उर्वरित ३९ जणांनी भाव कमी मिळाल्याचे कारण दाखवीत पैसे घेण्यास विरोध केला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात ३०९ गटातील ६४ प्रस्ताव आले. कोणाचेही पैसे वाटप नाही. उत्तर सोलापूर तालुक्यातून ११३ गटातून हा महामार्ग गेला असून, त्यांचे अजून प्रस्ताव मागणी केले नाहीत.

**फक्त २० टक्के वाटप**

हा महामार्ग ४५० कोटीचा आहे. आजतागायत २० टक्के म्हणजे ७९ कोटी रूपये वाटप केले आहे. १५ कोटी रूपये काही प्रस्ताव आलेल्या शेतकऱ्यांच्या नावे ऑनलाईनने टाकले आहेत. त्यामध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही शेतकरीही आहेत. मावेजाबाबत ज्या पध्दतीने वरिष्ठ पातळीवरून आम्हाला आदेश येतात; त्या धर्तीवर शेतकऱ्यांना मावेजा दिला जात आहे. अक्कलकोट तालुक्यात विरोध आहे.

**विरोध करणाऱ्यांचे पैसे न्यायालयात जमा**

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर तात्काल सर्कलच्या माध्यमातून पोलिस बंदोबस्तात विरोध असलेल्या शेतकऱ्यांच्या जमीनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. विरोध करणाऱ्यांचे पैसे न्यायालयात जमा केले जाणार आहे. लवकरच या महामार्गचे काम चालू करण्याचे आदेश आहेत. कर्नाटकमध्ये अशा प्रकारे सक्तीने जमीन ताब्यात घेऊन काम चालू झाले आहे. त्याच धर्तीवर प्रक्रिया केली जाणार आहे.

**– अभिजित पाटील**
(भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी)

## बा विठ्ठला...चमत्कार घडू दे; लालदिव्याची गाडी मिळू दे!

### आ.गोगावले यांचे पांडुरंगाला साकडे

सुराज्य/पंढरपूर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारमधील शिंदे गटाचे आमदार मंत्रीपदासाठी आसुसलेले आहेत. मंत्रीमंडळाचा विस्तार कधी होतोय, आणि आम्ही लालदिव्याच्या गाडीत कधी बसून याची प्रतिक्षा त्यांना लागून आहे.विस्ताराला मुहूर्त काही लागत नाही.तेव्हा शिंदे गटाच्या एका आमदाराने चक्क श्रीविठ्ठल-रूक्मिणी मातेलाच साकडे घातले.

श्री पांडुरंगाच्या दारात आलोय, आता पांडुरंगाला आमची कणव असेल तर तो करेल. रुक्मिणी मातेलाही साकडे घालणार आहे की, पांडुरंगाला काय कोडे पडले आहे ते सोडवं. आमच्या हातात तर काही नाही, पण जर त्या दोघांनी काही चमत्कार केला तर काहीतरी होईल, असा विश्वास शिंदे गटाचे आ.भरत गोगावले यांनी व्यक्त केला.



गोगावले हे पंढरपूरच्या दौऱ्यावर आले होते.श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी मंत्रीमंडळाच्या विस्ताराबाबत विचारलेल्या एका प्रश्नाला त्यांनी मिश्किलपणे उत्तर दिले. यांच्यानंतर गोगावले हे देखील मंत्रीपदासाठी प्रबळ दावेदार आहेत.श्रीविठ्ठलाला मोठ्या एकादशीच्या दिवशी महापूजेनंतर साकडे घातले जाते. एक दुष्काळ हटव. पाऊस-पाणी दे, हे दोनच प्रश्न प्रामुख्याने पांडुरंगाच्या चरणी असतात, पण कार्तिकिच्या तोंडावर एका आमदाराने चक्क सावळ्या विठ्ठलाला मंत्रीपदाची मागणी केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. राज्यात कायद्याचे राज्य आहे. त्यांनी काहीही चुका करायच्या, सरकारने गप्प बसायचे असे कधी होत नाही. भावनेच्या आहारी उद्या कोणी उठेल, काहीही करेल. त्यामुळे याला आता ब्रेक दिला तर उद्या दुसरा कोणी हिम्मत करणार नाही, असे गोगावले म्हणाले.

**ठाकरेंवर टीका**

गोगावले यांनी आदित्य ठाकरे यांच्यावरही हल्ला चढवला.ते म्हणाले की, ठाकरे गटाचे आमदार तथा माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्यावर डिलाईल रोडच्या पुलाच्या दुसऱ्या लेनचे उद्घाटन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. 'राज्यात कायद्याचे राज्य आहे. भावनेच्या आहारी उद्या कोणी उठेल आणि काहीही करेल. त्याला ब्रेक लागला पाहिजे.



### शेनिस पॅलासिओस विश्वसुंदरी

**नवी दिल्ली** : मध्य अमेरिकेतील निकाराग्वा देशाच्या शेनिस पॅलासिओसने २०२३ चा मिस युनिव्हर्स' (विश्वसुंदरी) किताब जिंकला. आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत निकाराग्वाने मिळवलेले हे पहिले विजेतेपद आहे. मिस युनिव्हर्स' स्पर्धेचे ७२ वे पर्व एल साल्वादोरची राजधानी सॅन साल्वादोर येथील जोस अडोल्फो पिनेडा एरिना येथे आयोजित केले होते. यात मिस थायलंड' अँटोनिया पोर्सिल्ड ही दुसरी आली आणि मिस ऑस्ट्रेलिया' मोराया विल्सनला तृतीय क्रमांक मिळाला. अशी माहिती मिस युनिव्हर्स' स्पर्धेच्या अधिकृत इंस्टाग्रामवर देण्यात आली.

## पडळकर, नामदेवराव जाधवांच्या प्रतिमा जोडे मारून जाळल्या

**शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी युवक काँग्रेसने केले आंदोलन**

सुराज्य/सोलापूर



राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्याबद्दल साहित्यिक नामदेवराव जाधव, आ. गोपीचंद पडळकरांनी खालच्या पातळीत टीका केल्याने शहर युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने यांच्या पोस्टरला जोडे मारो आंदोलन करून पोस्टर जाळण्यात आले.

साहित्यिक जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांच्यावर टीका केली होती, याचे पडसाद आता संपूर्ण राज्यात उमटले आहेत. भाजपचे नेते पडळकरदेखील वारंवार पवार यांच्यावर टीका करत आहेत. यांचा निषेध म्हणून चार हुतात्मा चौक येथे नामदेव जाधव आणि गोपीचंद पडळकर यांच्या पोस्टरला जोडे मारून पोस्टर जाळले.

नामदेवराव जाधव, गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार यांच्याबद्दल टीका करू नये अन्यथा त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा इशारा युवक अध्यक्ष अक्षय वाकसे यांनी दिला. यावेळी कार्याध्यक्ष सर्फराज शेख, गफूर शेख, जावेद शिकलगर, वैभव विभुते, सादिक मुजावर, गौस कुरेशी, रजनीकांत ठेंगील, संजय गायकवाड, परवेज शेख, सिध्द निशानदार, वाकसे, गिरीश म्हमाणे, अप्पा कोकाटे, रवी सोलंकर, जाकिर शेख, लाडजी नदाफ, अजमेर शेख, प्रसाद भास्कर आदी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्याकडे स्वेटरचा तसा उपयोगच नाही !

| कल्याण |
| --- |
| 159-53-148 |

| मुंबई |
| --- |
| 122-59-180 |



## उपमुख्यमंत्र्यांना महापूजेला येण्यास महादेव कोळी समाजाचा विरोध

सुराज्य/पंढरपूर

कार्तिकी एकादशीला पंढरपुरात विठूरायाची पूजेचा मान उपमुख्यमंत्र्याचा असतो. मात्र यंदा होणाऱ्या विठ्ठलाच्या शासकीय महापूजेला मराठा क्रांती मोर्चाने यापूर्वीच विरोध केला आहे. यानंतर आता महादेव कोळी समाजाने ही उपमुख्यमंत्र्यांना पंढरपूरला येण्यास विरोध केल्याने वादात आणखी भर पडली आहे.

कार्तिकी एकादशी तीन दिवसांवर आली आहे. पंढरपूरमध्ये कार्तिकी एकादशीला उपमुख्यामंत्रीच्या हस्ते शासकीय पूजा केली जात असते. परंतु, कोळी समाज बांधवांची आज पंढरपुरात बैठक घेत बैठकीतनंतर सदरचा निर्णय घेतला आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चाने उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणाऱ्या महापूजेला यापूर्वीच विरोध केला आहे. अशातच आता कोळी समाजाने ही विरोध केला आहे.

